# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक ०३.०८.२०२१

**ऑटो रिक्षा चोरी करणा-या सराईत आरोपीस अटक १,००,०००/-रु कि. चे दोन ऑटो रिक्षा हस्तगत व एकुण ०२ गुन्हयाची उकल**

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात ऑटो रिक्षा चोरीचे गुन्हयामध्ये वाढ झाली होती.त्यामुळे मा. पोलीस आयुक्त श्री. बिपीनकुमार सिंह व मा. सह. पोलीस आयुक्त श्री. डॉ. जय जाधव, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. डॉ. बी.जे. शेखर पाटील यांनी गुन्हे शाखेतील अधिकारी व अमंलदार यांना विशेष मोहीम राबवुन ऑटो रिक्षा चोरी करणा-या गुन्हेगारी टोळीच्या मुसक्या आवळुन वेळीच प्रतिबंध करण्याबाबत आदेश दिले होते.

त्या अनुषगांने मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. प्रविणकुमार पाटील, मा. सहा. पोलीय आयुक्त (गुन्हे) श्री. विनोद चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा, कक्ष-१, नवी मुंबईचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल शिंदे, सपोनि. आर.एम. तडवी,सपोनि. हर्षल कदम असे स्टाफसह रबाळे, कोपरखैरणे, एपीएमसी, वाशी , तुर्भे इ. पोलीस ठाणे हददीतील रिक्षा चोरी गुन्हयाचा समांतर तपास करीत होते. रबाळे पो. ठाणे गु.र.क्र. २२३/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्हयाचा समांतर तपास करून गुन्हयाचे घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले. नमूद सीसीटीव्ही फुटेजचे अवलोकन केले असता एक सशंयीत आरोपी हा गुन्हयातील रिक्षा चोरी करून घेवून जाताना दिसला. नमूद आरोपीची पोहवा/१५५७ चव्हाण यांनी माहिती प्राप्त केली असता सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील आरोपी नामे ओमकार दिलीप वरवटकर रा. सुखवैभव रहिवाशी संघ,
सेक्टर ४ ऐरोली हा असल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर सदर आरोपीची गोपनिय बातमीदारामार्फत माहिती काढली असता सदरचा आरोपी हा सध्या पवई मुंबई येथे राहत असल्याचे समजले. तसेच त्याचेवर यापूर्वी देखील रिक्षा चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे समजले. त्यानंतर सदर आरोपीचा आम्ही शोध घेत असताना दिनांक १०/०७/२०२१ रोजी पोहवा/१५५७ चव्हाण यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, नमूद आरोपी हा त्याचे पूर्वीचे राहते ठिकाणी सेक्टर ४ ऐरोली परिसरात येणार आहे. मिळालेल्या बातमीनुसार सपोनि आर.एम.तडवी तसेच पोहवा/१५५७ चव्हाण, पोना/२९९९ भांगरे व पोशि/३५४२ कुटे यांचेसह सेक्टर ४ ऐरोली परिसरात सापळा रचून नमूद आरोपीस शिताफीने ताब्यात घेतले. आरोपीकडे केलेल्या तपासात त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबूली दिली असून नमूद आरोपीकडे सखोल तपास करून त्यांचेकडून १,००,०००/-रु कि. च्या दोन ऑटो रिक्षा जप्त करण्यात आलेल्या आहेत. खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

**<u>उघडकिस आणलेले गुन्हे :-</u>**

**१ ) रबाळे पोलीस ठाणे गु.र.क्र. २२३/२०२१ भा.द.वि. कलम ३७९**

**२) पवई पोलीस ठाणे,मुंबई शहर गु.र.क्र. ३८१/२०२१ भादवि कलम ३७९**

तसेच नमूद आरोपी याचेवर यापूर्वी खालीलप्रमाणे ऑटो रिक्षा चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

१ ) रबाळे पोलीस ठाणे गु.र.क्र. २३२/२०२० भादवि कलम ३७९

२) रबाळे पोलीस ठाणे गु.र.क्र. १०८/२०२१ भादवि कलम ३७९

**<u>अटक आरोपींचे नाव-</u>**

ओमकार दिलीप वरवटकर वय २८ वर्षे धंदा- रिक्षाचालक रा. रुम नं. पी-७६ सुखवैभव रहिवाशी संघ, सिडको कॉलनी सेक्टर ४ ऐरोली नवी मुंबई

**सदरची कामगिरी गुन्हे शाखा,कक्ष-१ चे खालील तपास पथकाने केली आहे महत्त्वपुर्ण भुमिका पार पाडलेली आहे.**

१) श्री. सुनिल शिंदे वरिष्ठ पोलीस निरीक्षक

२) हर्षल कदम सहा. पोलीस निरीक्षक

३) राजु तडवी सहा. पोलीस निरीक्षक

४)पोलीस हवा. /बालाजी चव्हाण

५)पो.ना. धनाजी भांगरे

६)पोशि गणेश कुटे

-------------